पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १५४ /२०२४ दि. ०३/०९/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, नौपाडा** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. सदर कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) गोखले रोड कडून तसेच मढवी हाउस कडून तसेच श्रद्धा वडापाव कडून राम मारूती रोडने पु.ना.गाडगीळ चौकातून ग्रीन लीफ हॉटेल मार्गे गडकरी सर्कलकडे तसेच मुस चौकाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **पु.ना. गाडगीळ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने राम मारूती रोडने – गजानन महाराज चौक मार्गे – दगडी शाळा – किंवा तीन पेट्रोल पंप मार्गे किंवा अल्मेडा चौक येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) अल्मेडा चौक कडून गजानन चौक मार्गे राम मारूती रोड व स्टेशन कडे जाणा–या हलक्या चारचाकी, दुचाकी वाहनांना **पु.ना. गाडगीळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने राम मारूती रोड – गोखले रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) अम्लेडा चौकातून गजानन महाराज चौक मार्गे पु.ना. गाडगीळ – ग्रीन लीप मार्गे स्टेशनकडे जाणा–या सर्व प्रकारच्या बसेस, अवजड वाहने यांना **गजानन महाराज चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गजानन महारात चौकातून उजवे वळण घेवून तीन पेट्रोल पंप हरिनिवास सर्कल मार्गे गोखले रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) चरई कडून गडकरी सर्कल कडे जाण–या सर्व प्रकारच्या वाहनांना **हॉटेल बिर्याणी दरबार** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सेंट जॉन हायस्कूल समोरून मालतीबाई हॉस्पीटल येथून चिंतामणी चौक अथवा टेंभीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) गडकरी सर्कल कडून चिंतामणी चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. तसेच गडकरी सर्कल कडून मूस चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद –** ६) ठाणे रेल्वे स्टेशन कडून ठाणे महानगर पालिकेच्या बसेस, तसेच एस टी महामंडळ बसेस तसेच चार चाकी व दुचाकी वाहनांना गडकरी सर्कल कडे जाण्यास **मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने स्टेशन कडून मुस चौक – टॉवर नाका मार्गे टेंभीनाका येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) ठाणे रेल्वे स्टेशन कडून ठाणे महानगर पालिकेच्या बसेस, तसेच एस टी महामंडळ बसेस तसेच चार चाकी व दुचाकी वाहनांना टॉवर नाका कडून गडकरी सर्कलकडे तसेच जांभळी नाका कडून टॉवर नाका मार्गे गडकरी सर्कलकडे जाण्या–या सर्व प्रकारच्या वाहनांना **टॉवर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने टॉवर नाका मार्गे टेंभीनाका येथून इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग –** अ) टॉवर नाका – गडकरी रंगायतन – बोटिंग क्लब पर्यंत मासूंदा तलाव रोडचे दोन्ही बाजूस कोणतीही वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

ब) ठाणे महानगर पालिका भवन ते अल्मेडा चौक व ठाणे महानगर पालिका भवन ते ओपन हाउस, आराधना क्रॉस, आंपन हाउस ते भक्ती मंदिर दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतीही वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

CamScanner

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**<u>प्रति,</u>**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u> :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत</u>** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner